# घामाची फुले

: १८

आपल्या वर्गातील मुले घेऊन गुरुजी त्या दिवशी वनभोजना
गेले होते. मुलांना खूप आनंद होत होता. आज मोकळेपणा हो
हसणे खेळणे चालले होते. प्रत्येकाने बरोबर शिदोरी आणली हो
रस्त्याने काव्यशास्त्रविनोद[1] करीत गुरुजी व विद्यार्थी जात होते.

पावसाळा संपत आला होता. हस्ताचे नक्षत्र सुरू होते. "हस्त
पाणी । मुबलक पीक आणी," अशी म्हण आहे. हस्ताचा पाऊस
पडला होता. शेतेभाते सुंदर दिसत होती. शेतकरी आनंदला होता

"साऱ्या जगात चांगले पाणी कोणते? पवित्र पाणी कोण
मोलवान पाणी कोणते?"—गुरुजींनी प्रश्न केला.

"गंगेचे पाणी सर्वांत पवित्र."—सदू म्हणाला.

"पावसाचे पाणी सर्वांत पवित्र."—विनू म्हणाला.

"सिंहगडचे देवटाक्यातील पाणी फार चांगले."—शंकर म्हण

"पश्चात्तापामुळे डोळ्यातून पाणी येते ते सर्वांत थोर."—वि
करणारा लक्ष्मण म्हणाला.

"प्रेमासाठी मनुष्य रडतो, ते पाणी खरे."—प्रेमळ नामदेव म्हण

मुले अशी उत्तरे देत होती. परंतु त्या उत्तरांनी गुरुजींचे सम
झाले नाही.

"कोणाचे उत्तर बरोबर?"—कोणतेही उत्तर न देणाऱ्या
विचारले.

"माझ्या मनातील उत्तर कोणीच दिले नाही."—गुरुजी म्हण

"म्हणूनच मी उत्तर दिले नाही. उगीच कशाला सांगा!
हसत मधू म्हणाला.

"तुमच्या मनात कोणते आहे उत्तर?"—मुलांनी विचारले.

"मी एक गोष्ट सांगतो. त्यावरून कळेल."—गुरुजी म्हणा
मुलांना गोष्टीहून अधिक प्रिय काय आहे? गोष्ट सांगतो, म्हण



विद्यार्थी जवळजवळ आले. मधू मागे रेंगाळत होता, तो आता गर्दी
गुरुजींच्या अगदी जवळ येऊन चालू लागला. गोष्टीस आरंभ झाला.
म व लक्ष्मण सीतेचा शोध करीत वनातून जात होते. वाटेत त्यांना
भेटली. शबरी भेटली. रामासाठी ती वाट पाहात होती. रामा-
तिने गोड फळे आणून ठेवली होती. शबरीने रामाची पूजा
त्यांच्यापुढे ती फळे ठेवली.

शबरी राहात होती, तो एक जुना आश्रम होता. तेथे आता ती
राहात होती. त्या आश्रमाच्या समोर दूरवरपर्यंत दृष्टी जाईल
फुलेच फुले दिसत होती. सुंदर सुगंधी फुले. रामचंद्र सारखे त्या
डे बघत होते. शेवटी ते शबरीला म्हणाले, "शबरी, कोणी लावली
ले? कशी दिसतात छान! वासही किती गोड येत आहे!"

बरी म्हणाली, "रामा, तो एक इतिहास आहे. मी सांगते ऐका.
वर्षांपूर्वी येथे मतंग ऋषींचा आश्रम होता. त्यांची कीर्ती सर्वत्र
ली होती. नाना ठिकाणचे विद्यार्थी त्यांच्या आश्रमात शिकण्यासाठी
राहिले. भिल्लांची मुलेही शिकण्यासाठी येऊ लागली. मतंग ऋषी
प्रेमळ. ते जसे प्रेमाचे सागर होते, तसेच ज्ञानाचे. आपल्या
तील मुले पुढे चांगली व्हावीत म्हणून ते झटत.

कदा काय झाले? उन्हाळा संपत येत होता. थोड्याच दिवसांनी
णी, मृग ही पावसाची नक्षत्रे सुरू होणार होती. परंतु पावसाळ्या-
म्हणून आश्रमात जळणाची काहीच तरतूद केलेली नव्हती, लाकडे
केलेली नव्हती. पावसात का ओली लाकडे पेटणार? स्वयंपाक कसा
र? उन्हाळ्याचे अद्याप चार दिवस आहेत, तोच जंगलातून
ल्या लाकडांच्या मोळ्या आणून ठेवल्या पाहिजे होत्या. परंतु
जाणार व आणणार?

े आपण होऊन रानात जातील असे मतंग ऋषींना वाटत होते.
ले गेली नाहीत. शेवटी एके दिवशी वृद्ध मतंग ऋषी हातात कुऱ्हाड
निघाले. ते निघाले असे पाहताच सारी मुलेही निघाली. आश्रमात

उतरलेले मोठमोठे ऋषी, मुनी, तेही निघाले. महापुरुष पुढे होताच
दुनिया त्यांच्या पाठोपाठ येऊ लागते.

सर्व लहानथोर मंडळी रानात गेली. लाकडे तोडू लागली. लाक
ढीग पडला. मग लहानमोठ्या मोळ्या बांधण्यात आल्या. लहान
डोक्यावर लहान, मोठ्यांच्या डोक्यावर मोठ्या. स्वतः मतंग ऋषींन
डोक्यावर मोळी घेतली होती, मंडळी आश्रमात येण्यासाठी निघा
तिसरा प्रहर होत आला. सर्व घामाघूम झाले. अंगातून घाम ठिप
होता. ते घामाचे थेंब भूमीवर पडत होते.

आश्रम आला. सर्वांनी विसावा घेतला. आज रात्री अध्ययन न
सर्व मंडळी लौकरच झोपली. सारे थकले होते. भगवान मतंग ऋषी
ध्यान करीत होते. आपल्या आश्रमातील मुले पुढे चांगली निघोत, जग
सेवा करोत, अशी ते प्रभूला प्रार्थना करीत होते.

पहाट झाली. मतंग ऋषींनी गोड हाका मारून मुलांना उठविले
बरोबर घेऊन ते नित्याप्रमाणे नदीवर निघाले; तो काय आश्
एकाएकी वास आला.—सुंदर सुगंध आला.

" कोठून येतो हा गोड वास ? "—मुले म्हणू लागली.

" जा शोध लावा. "—मतंग ऋषी म्हणाले.

त्या सुगंधाचा शोध लावण्यासाठी मुले निघाली. ज्या बाजूने वास
होता, त्या बाजूने निघाली. ज्या रस्त्याने काल ती रानांत गेली हो
परत आली होती, त्या रस्त्याच्या बाजूने सुगंध येत होता. मुले
वळली. रामा, त्या मुलांना काय बरे दिसले ? त्या मुलांना ठायी
सुंदर फुले फुललेली दिसली. कोठून आली ती फुले ? काल न
एकदम कोठून आली ? आकाशातील तारे का आश्रमासमोर
पवित्र होऊ पाहात होते ? कोणी लावली ती फुले ?

मुले धावत मतंग ऋषींजवळ आली. त्यांनी ती आश्चर्यकथा
सांगितली. मतंग ऋषी स्वतः मुलांबरोबर तो अपूर्व देखावा पाहावया
सूर्याचे कोवळे किरण येत होते. त्या फुलांवर ते नाचू लागत होते





जणू ते चुंबन घेत होते. सुंदर, अपूर्व देखावा ! मतंग ऋषी पाहातच
त्यांनीही भक्तिप्रेमाने त्या फुलांना हात लावून वंदन केले.

भगवान, कोठून आली ही फुले ? "—मुलांनी विचारले.

तुमच्या घामातून. काल या रस्त्याने डोक्यावर मोळ्या घेऊन तुम्ही
तुमच्या अंगातून घाम निथळत होता. या पृथ्वीवर तो गळत होता.
पवित्र घाम. निढळाचा[२] घाम. त्याहून पवित्र काय आहे ? तुम्ही
लेत, कसे घामाघूम झालेत, हे पाहण्यासाठी जणू भूमातेने हे
डोळे उघडले आहेत. तिचे हृदय तुमचे श्रम पाहून जणू फुलले.
श्रमासारखे पवित्र काही नाही; श्रमांचा घाम म्हणजेच देवाचे
तुमच्या मनावर हे ठसविण्यासाठी जेथे जेथे काल तुमचा घाम
तेथे तेथे देवाने फुले फुलविली आहेत. तुम्ही श्रमांना कंटाळू नये,
श्रमाचा महिमा प्रभू तुम्हांला या फुलांच्या रूपाने शिकवीत आहे.
घाम नसेल तर जग कसे चालेल ? शेतकरी श्रमणार नाही, त्याचा
तात पडणार नाही, तर शेते कशी पिकतील ? विणकर व
ना दमणार नाही, तर अंगावर काय घालाल ? घरे बांधणारे श्र
तुमची घरे बांधून न देतील तर राहाल कोठे ? ही दुनिया श्रम-
लोकांमुळे चालली आहे. तुम्ही मोठे झालात म्हणजे स्वतः श्रमा
या लोकांना मान द्या. वेदामध्ये एका थोर महर्षींने लिहिले आहे.—

" **न हि श्रान्तस्य ऋते सख्याय देवाः ।** "

णजे जो दमलेला नसेल, त्याची मैत्री देव करीत नाही. देव त्याचा
माने हातात घेईल, ज्याचा हात काम करून दमलेला आहे, काही-
गात मंगल[४] निर्माण करण्यासाठी दमलेला आहे. आळशाचा,
च्या देव मित्र नाही. समजलेत ना ? आता कामाचा कंटाळा
का. समजले ना ? "—मतंग ऋषींनी प्रेमाने विचारले.

होय गुरुजी. आम्ही काम करू, कोणतेही काम करावयास
र नाही. श्रमणाऱ्या लोकांना तुच्छ मानणार नाही. त्यांना मान
यांच्यामुळे दुनिया चालली आहे असे सदैव मनात बाळगून

त्यांच्याविषयी कृतज्ञ राहू. ते आधी सुखात आहेत की नाही ते पा
मुले मतंग ऋषींस म्हणाली.



" जेथे जेथे काल तुमचा घाम पडला, तेथे तेथे देवाने फुले फुलविली आहेत."

रामा, असा ह्या फुलांचा इतिहास आहे. ही फुले मेली नाहीत. नेहमी महिने फुलतात. त्यांना कोणी पाणी घालो वा न घालो. ती सदैव ीत घवघवीत दिसतात. जणू तो घामाचा एक थेंब अनंत काळपर्यंत ओलावा देणार आहे. या आश्रमात आता कोणी नाही. भगवान ऋषी निजधामास[५] गेले. मग येथे कोण राहणार ? येथे ना आता ीं, ना कोणी ऋषिमुनी परंतु ही फुले मुकेपणाने मतंग ऋषींचा जगाला सांगत आहेत. रामा, तुम्हाला देऊ का फुले तोडून ? "

नको, त्या फुलांना मला वंदन करू दे. ती फुले म्हणजे त्या ऋषींची तपस्या, त्या महर्षींची पुण्याई."—असे म्हणून रामाने फुलांस केला. लक्ष्मणानेही केला. रामलक्ष्मण निघून गेले. फुलांचा सुवास ाबरोबर जात होता. शबरीची भक्ती व मतंग ऋषींची पुण्याई ाबरोबर जात होती.

गुरुजी थांबले. मुले बोलत नव्हती. सारे मुकाट्याने चालत होते.

" संपली का गोष्ट ? " मधूने विचारले.

" संपली."—गुरुजी म्हणाले.

" मग कोणते पाणी चांगले ? "—मधूने विचारले.

" घामाचे पाणी "—लक्ष्मण म्हणाला.

" श्रीमंतांना तर सारखा घाम येतो. गादीवर लोळून घाम येतो. अंगा- ूप कपडे असल्यामुळे घाम येतो. कोणाकोणाच्या अंगात खूप वात[६] ो. त्यांना तर किती घाम येतो देव जाणे ! "—मधू म्हणाला.

" तो घाम नव्हे. ज्यातून काही तरी उपयोगी निर्माण होते. सर्वांना ाऱ्या वस्तू निर्माण होतात, धान्य, फुले, फळे, घरे, दारे, कपडे, संसारोपयोगी वस्तू निर्माण होतात, तो घाम पवित्र. प्रामाणिक ा निढळाचा घाम. तो पूज्य, तो युक्त; तो खरा मनुष्य. परंतु त्यांचीच दैना आहे. तुम्ही त्या श्रमणाऱ्यांची, उद्या मोठे झालेत ने, बाजू घ्या. त्यांचे संसार सुखाचे करा."—गुरुजी म्हणाले.

♣ ♣ ♣